पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २१/१२/२०१९

## मौजा पयडी येथे भव्य जनजागरण मेळावा संपन्न

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो., अपर पोलीस अधिक्षक, श्री. अजयकुमार बंसल सा़ो., अपर पोलीस अधिक्षक, मा. श्री. डॉ. मोहितकुमार गर्ग सा़ो., श्री. अमोल भारती सा़ो., उप विभागीय पोलीस अधिकारी, कारवाफा यांच्या मार्गदर्शनाखाली मौजा पयडी येथे भव्य जनजागरण मेळावा व राणी दुर्गावती हस्तकला स्पर्धा घेण्यात आली.

सदर मेळाव्यात ग्रामसेवक यांनी ग्रामस्थांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. आरोग्य अधिकारी यांनी हिवताप व मलेरीया यावर प्रतिबंधक उपाययोजना सांगून उपस्थितांची आरोग्य तपासणी केली. तसेच तरुण-तरुणींना उप पोस्टे पेंढरी येथे सुरु करण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्राची तसेच रोजगार मेळावा ॲपची माहिती देवुन नाव नोंदणी करण्याबाबत सांगण्यात आले. गावातील हॉलीबॉल टिमला नेट व बॉल देवुन गावातील तरुणांना पोलीस भरती व शासकीय सेवेत तयारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

राणी दुर्गावती हस्तकला स्पर्धेतील विजेत्या महिलांना प्रथम, व्दितीय व तृतीय अनुक्रमे ३,०००/-,२,०००/- व १,०००/- रुपये रोख बक्षीस देण्यात आले. गरजु व्यक्तींना ब्लँकेट व टोपली वाटप करुन जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना स्कुलबॅग व नोटबुकचे वाटप करुन उपस्थितांना जेवन देवुन मेळाव्याचा समारोप करण्यात आला. सदर मेळाव्यात गावातील सरपंच, उपसरपंच, गाव पाटील व ९०० ते १००० नागरिक सहभागी झाले होते.





पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २१/१२/२०१९

## अतिदुर्गम मौजा खंडी येथे भव्य जनजागरण मेळावा संपन्न

=> शासनाच्या विविध योजनांची देण्यात आली माहिती

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़े., अपर पोलीस अधिक्षक, श्री. अजयकुमार बंसल सा़े., अपर पोलीस अधिक्षक, मा. श्री. डॉ. मोहितकुमार गर्ग सा़े., अपर पोलीस अधिक्षक, अहेरी श्री. मनीष कलवानिया सा़े. व मा. उप विभागीय पोलीस अधिकारी, भामरागड श्री. सोनावणे सा़े., यांच्या मार्गदर्शनाखाली पोमके नारगुंडा हद्दीतील मौजा खंडी येथे भव्य जनजागरण मेळावा घेण्यात आला. मेळाव्यास मौजा कुचेर, खंडी, नैनवाडी, नारगुंडा येथील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन CRPF चे पोलीस निरीक्षक सुरेंदर सिंग तर प्रमुख पाहुणे म्हणुन खंडी गावाचे पाटील कटिया, नैनवाडी गावाचे पाटील बाजीराव मडावी व खंडी गावाच्या अंगणवाडी सेविका रजनी कुडयामी उपस्थित होते.

मेळाव्या दरम्यान पोउपनि खडके व पोउपनि वणवे यांनी उपस्थितांना पोलीस विभागा मार्फत नक्षल गावबंदी योजना, आत्मसर्पन योजना, द्या माहिती व्हा लखपती योजना इ. ची माहिती समजावुन सांगत पोलीस विभाग, महसुल विभाग, महावितरण व पंचायत समितीच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

सदर मेळाव्याला उपस्थित M.D (Master in divinity) शिक्षण झालेल्या व सध्या चेन्नई येथे असलेला स्थानिक आदिवासी युवक विनोद एक्का याने सर्व योजना माडिया भाषेत उपस्थितांना समजावुन सांगीतल्या सदर मेळाव्याला विसामुंडी आरोग्य उपकेंद्राचे आरोग्य सेवक श्री. पुरुषोत्तम कुंभरे उपस्थित होते. त्यानी मेळाव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करुन आरोग्य विभागामार्फत महिला, लहान मुले व वृध्द यांची वैद्यकीय तपासणी केली.

तसेच मेळाव्याला आदिवासी विभागाचे निरीक्षक श्री. भुजाडे व प्रकल्पचे संघटक श्री. कुळसंगे उपस्थित होते. त्यानी आदिवासीसाठी असलेल्या घरकुल व इतर योजनांची माहिती देवुन उपस्थितांना लाभ घेण्याचे आवाहन केले.

सदर मेळाव्या दरम्यान राणी दुर्गावती महिला हस्तकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्याला आदिवासी महिलांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे प्रथम क्रमांक फुलमनी तिरकी रा. खंडी, व्दितीय क्रमांक सुम्मा वेळदा रा. नैनवाडी, तृतीय क्रमांक नानी हेडो रा. कुचेर यांचा आला असुन त्यांना अनुक्रमे ३,०००/- रुपये, २,०००/- रुपये व १,०००/- रुपये बक्षीस देण्यात आले.

मेळाव्या दरम्यान खंडी गावाला लग्न व इतर कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे भांडी व पण्णी यांचे वाटप केले. तसेच उपस्थित महिलांना साडी वाटप, इतरांना कपडे वाटप करण्यात येवुन उपस्थितांना जेवनाची मेजवानी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पोउपनि वणवे यांनी करुन उपस्थितांचे आभार मानले. मेळावा यशस्वीरित्या पार पाडण्यात जिल्हा पोलीस, CRPF व SRPF च्या पोलीस अधिकारी व जवानांनी मोलाचे सहकार्य केले.


पोलीस मदत केंद्र, नारगुंडा


जनजागरण
पोलीस मदत केंद्र, नारगुंडा